▲ दि. ३१.५.९९ ▲ जनवाद ▲

# संमिश्र



निर्झर संस्थेतर्फे आयोजित कथ्थक प्रशिक्षण शिबिरात उत्साहाने सहभागी झालेले नागपूरचे नर्तक.

# शास्त्रीय नृत्यकलेचा प्रभाव कमी झालेला नाही - गंगानी

**प्रतिनिधी**

नागपूर, ३१ मे

पाश्चात्य नृत्याच्या भुरळ घालणाऱ्या वातावरणात शास्त्रीय नृत्यकलेचा प्रभाव कमी होतो आहे असे आपणास अजिबात वाटत नाही, असे मत सुप्रसिद्ध कथ्थक नृत्य पंडित राजेंद्र गंगाणी यांनी येथे व्यक्त केले. निर्झर कला संस्थानतर्फे सुरू असलेल्या नृत्य कार्यशाळेत आयोजित वार्तालापात ते बोलत होते.

पाश्चात्य नृत्यशैलीचा प्रभाव अल्पकालीन असून शास्त्रीय नृत्यशैलीला आजही देश व विदेशातील कलावंत प्राधान्य देतात. शास्त्रीय नृत्याचा आधार हा आध्यामिक असल्याने नृत्य हे केवळ मनोरंजनाचे साधन न उरता ते ईश्वरभक्तीचे माध्यम बनते. आजच्या वेगवान युगात नृत्यसाधनेसाठी आवश्यक तितका वेळ जरी देता येत नसला, तरी नृत्य शिकण्याचे प्रमाण कमी झालेले दिसत नाही. त्यामुळे आपल्या मुलांपर्यंत कोणते संस्कार पोहचू द्यायचे याचा निर्णय माता-पित्यांनी करावा, असे मत श्री. गंगाणी यांनी व्यक्त केले.

सिनेसृष्टीतील दाखविण्यात येणारी नृत्ये ही नृत्यप्रकारात मोडणारी नाहीत. रस्त्यावर जर तुम्ही ढोल उभे घेऊन वाजवित राहिलात तर चार माणसे गोळा होतील आणि नाचू लागतील. त्या नाचाला नृत्य म्हणता येत नाही. नृत्यकलेसाठी तपश्चर्या करावी लागते. ही साधना गुरू-शिष्य परंपरेनुसार केली जाते. या क्षेत्रात शॉर्टकटला कुठेच स्थान नाही. किमान १२ वर्षे साधना केल्यानंतरच तुम्ही एखाद्या नृत्यशैलीत पारंगत होऊ शकता, असे श्री. गंगाणी यांचे मत आहे.

नृत्यप्रकाराला नागरिकांमध्ये लोकप्रिय व प्रचलित करण्यासाठी शासनावर अवलंबून राहता येत नाही. शासनाने लोककलांना जिवंत ठेवण्यासाठी अनेक कलाकेंद्रे व कलागृहे उभारली आहेत. मात्र या केंद्रांचा वापर नीट झाला तरच त्यांच्या निर्मितीमागील उद्देश सफल होऊ शकतो. पूर्वीसारखी गुरू-शिष्य परंपराही राहिलेली नाही. आता तसे गुरूही आढळत नाहीत. त्यामुळे नृत्य शिकू इच्छिणाऱ्या शिष्यांसमोर अनेक प्रश्न उभे राहतात. आमदार निवासात सुरू असलेल्या कार्यशाळेत राज्यातील विविध भागातून आलेले ३० प्रशिक्षणार्थी सध्या जयपूर घराना पद्धतीचे प्रशिक्षण घेत आहेत. ■

## ‘निर्झर’तर्फे नृत्य कार्यशाळा

# शास्त्रीय नृत्यकलेत ‘शॉर्टकट’ नाही -पं. गागाणी



कथ्थक नृत्य प्रशिक्षण शिबिरार्थींना मार्गदर्शन करताना पं. गांगाणी


▲ कार्यालय प्रतिनिधी ▲

नागपूर, दि. ३० :- चित्रपटसृष्टी पॉपगीत, रिमिक्स व अल्बममध्ये थोड्या परिश्रमाने लवकर लोकप्रियता मिळविता येते. परंतु शास्त्रीय नृत्य कलेसाठी वर्षानुवर्षे साधना करावी लागते त्यात ‘शॉर्टकट’ला स्थान नाही असे प्रतिपादन आज गफ्फूर घराण्याचे कथ्थक नृत्य निपुण कलावंत पंडित राजे गांगाणी यांनी केले.

शहरातील नृत्य कलेला वाहून घेतलेल्या निर्झर कला संस्थानच्या वतीने आमदार निवास आयोजित कथ्थक नृत्य कार्यशाळेत मार्गदर्शन करण्यासाठी पं. गांगाणी नागपुरात आले होते. त्यावेळी ते पत्रकारांशी बोलत होते. पुढे म्हणाले की, शास्त्रीय नृत्य हा प्रकारच मुळात गुरूशिष्य परंपरेतील आहे. परंतु, आजच्या स्थितीत गुरू आपल्या घरी शिष्यांना वास्तव्यास ठेऊन प्रशिक्षण देऊ शकत नाही. त्यामुळे काळाच्या बंधनात शिष्यांना प्रशिक्षण द्यावे लागते सोबतच त्यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील प्रगतीचाही विचार करावा लागतो. त्यामुळे इन्स्टिट्यूटमध्ये आवड असणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांच्या क्षमतेची चाचणी घेऊन प्रशिक्षण द्यावे लागते. पूर्वी कलेला राजाश्रय होता. आज सरकार मदत करते परंतु, त्यावर पूर्णतः अवलंबून राहून साधना शक्य नाही. अशी खंतही पं. गांगाणी यांनी व्यक्त केली. पाश्चिमात्य नृत्य प्रकार हा अल्पकाळ टिकणारा आहे. परंतु, शास्त्रीय नृत्यकला ही चिरंतन टिकणारी आहे असेही पं. गांगाणी यांनी सांगितले. शास्त्रीय नृत्यप्रकारात विदेशी लोक जास्त रूची घेतात. तसेच ते या प्रकारांवर अधिक सखोल अध्ययन करतात असेही पं. गांगाणी म्हणाले.

या नृत्य कार्यशाळेत एकूण ३० प्रशिक्षणार्थी आहेत त्यात दोन मुलांचाही समावेश उद्या ३० रोजी या कार्यशाळेचा समारोप होणार आहे. या शिबिरात मुंबई, पुणे, जळगाव, लातूर या ठिकाणाहून मुली सहभागी झाल्या आहेत. पत्रपरिषदेला ‘निर्झर’च्या सौ. साधना नाफडे, समीर नाफडे व राम भाकरे हजर होते.

# मुलाखत



एका भावपूर्ण मुद्रेत राजेंद्र गंगाणी

## अभ्यासक्रमात पारंपरिक नृत्यकलेचा समावेश असावा-गंगाणी

लोकमत वृत्तसेवा

बुधवार

नागपूर : डिस्को-ब्रेक डान्सच्या संस्कृतीमुळे आपली युवा पिढी व्यसनाधीन होत चालली असून याला आळा घालण्यासाठी शाळा आणि महाविद्यालयीन अभ्यासक्रमात कथ्थकसह इतर पारंपरिक नृत्यकलांचा समावेश असणे आवश्यक आहे, असे मत केंद्र शासनाच्या सांस्कृतिक विभागातर्फे संचालित दिल्ली येथील राष्ट्रीय नृत्य केंद्राचे शिक्षक आणि प्रसिद्ध कथ्थक नर्तक पंडित राजेंद्र गंगाणी यांनी व्यक्त केले.

स्थानिक निर्झर कला संस्थेतर्फे आयोजित कार्यशाळेत कथ्थक नृत्याचे धडे देण्यासाठी ते सध्या नागपुरात आले आहेत. राजेंद्र गंगाणी हे जयपूर घराण्यातील लोकप्रिय कलाकार आहेत. जयपूर घराण्याचे प्रमुख असलेले पंडित कुंदनलालजी गंगाणी यांचे पुत्र राजेंद्र यांनी आपल्या वडिलांकडूनच नृत्याची कला आत्मसात केली. अमेरिका, इंग्लंड, जपान, युरोप आदी १५ देशांमध्ये त्यांनी आपल्या कथ्थक नृत्यकलेचा अविष्कार केला असून तेथे कार्यशाळाही घेतल्या आहेत. 'संगीत राज' आणि 'शास्त्रीय नृत्य शिरोमणी' या उपाधींनी त्यांना सन्मानित करण्यात आले आहे. कर्नाटक संगीत अकादमीने त्यांना पंडित ही उपाधी बहाल केली आहे. कथ्थक नृत्यकलेशिवाय तबला, पखवाज आणि गायनातही ते माहिर आहेत. जन्मजात कलावंत असलेल्या राजेंद्र गंगाणी यांनी वयाच्या पाचव्या वर्षी पहिला जाहीर कार्यक्रम दिला. वडिलांकडून कथ्थकचे बाळकडू घेत असतानाच दिल्लीस्थित केंद्र शासनाच्या कथ्थक कला केंद्रात त्यांनी प्रवेश घेतला. सहा वर्षे शिक्षण पूर्ण केल्यानंतर याच केंद्रात कथ्थक शिकविण्यास प्रारंभ केला.

विदेशातील भारतीयांमध्ये भारतीय संस्कृती आणि कलेबद्दल जशी जागरूकता निर्माण झाली आहे तशीच जागरूकता भारतात निर्माण होण्याची आज नितांत गरज असल्याचे त्यांनी सांगितले. ते म्हणाले, पाश्चिमात्यांच्या अनुकरणामुळे भारतीय संस्कृती उद्ध्वस्त होत चालली असून देशासाठी ही परिस्थिती घातक आहे. आपल्या मुलांना भारतीय नृत्यकला शिकवायची की डिस्कोत पाठवायचे ही पालकांची जबाबदारी आहे. डिस्कोत जाऊन मुलांना अमली पदार्थ आणि दारूचे व्यसन लागत असून पालकांना मात्र याचे गांभीर्य समजू नये याचे त्यांनी आश्चर्य व्यक्त केले. विदेशात भारतीय संस्कृतीचे आकर्षण वाढत असताना आपण आपल्या संस्कृतीची जोपासना न करणे कितपत योग्य आहे, असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला.

भारतीय कलेच्या बदलत्या स्वरूपाबद्दल चिंता व्यक्त करताना राजेंद्र गंगाणी म्हणाले, कलेचे मूळ स्वरूप कायम ठेवून काही चांगले बदल होणार असतील तर हरकत नाही. परंपरा बदलून हे सर्व करणे आम्हाला पसंत नाही.